# मशीनची देखभाल

गणू नाना शिंप्याकडे गेला होता.
नानाने मशीन उघडले होते.
गणूला मजा वाटली.
गणू तिथेच पहात बसला.



गणूला शंका आली, मशीन बिघडले आहे का?
गणूने नानाला विचारले.
नाना म्हणाला, "छे! छे! आठवड्याचे
तेलपाणी चालले आहे."

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४००००५
प्रकाशक-इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११०२९

नाना म्हणाला
मशीनवर धूळ बसते. आत जाते.
मशीन साफ केले पाहिजे.
ब्रश मारला पाहिजे.



मशीनमध्ये दांडे, चाके, स्प्रिंग, स्क्रू
असतात. खूप भाग असतात.
चालून चालून वहाणा झिजतात,
तसे चालवून चालवून त्याचे भाग
झिजतात. मशीन आवाज करते.
काम देत नाही.

मशीनला तेल दिले की ते ह्या भागात जाते.
झीज खूप कमी होते. मशीन खूप दिवस काम देते.

मशीनवर बारीक टोप्या होत्या. नानाने त्या उघडल्या.



दोन तीन थेंब तेल आत सोडले.
टोप्या बंद केल्या. एक टोपी पडली आहे.
त्यात कागदाची सुरळी खोचली.
आता धूळ आत शिरणार नाही.

नाना सांगत होता —
गाडीचे चाक, सायकल, रहाट, पंप
यांना तेलपाणी केले पाहिजे. खोबरेल
गोडेतेल किंवा एरंडेल सुध्दा चालेल.
यंत्रातली खरखर कमी होईल.
यंत्रे खूप काम देतील.

मशीन बिघडण्याची वाट पाहू नका. वरचेवर तेलपाणी करा.

भोकातून बाहेर आलेले तेल नानाने पुसून घेतले.
आता कपड्यांना तेल लागणार नाही.
नानाने मशीन चालवून पाहिले.

तेलपाणी झाल्यावर मशीनवर झाकण घातले.

